जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 8 OCT 2026

सकाळ

कलावंतांवर सांस्कृतिक आरोग्य जपण्याची जबाबदारी

डॉ. मिलिंद शिंदे : शिवाजी विद्यापीठात कार्यशाळेचा समारोप

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ७ : समाजाचे सांस्कृतिक आरोग्य जपण्यासह दुर्लक्षित आणि वंचित घटकांच्या जगण्याला मुख्य प्रवाहाशी जोडण्याची महत्त्वाची जबाबदारी कलावंताची आहे, असे प्रतिपादन अभिनेते व लेखक डॉ. मिलिंद शिंदे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा बी.ए. फिल्म मेकिंग विभाग आणि अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ यांच्यातर्फे 'वंचित घटकांचे सिनेमातील स्थान' या विषयावर घेण्यात आलेल्या कार्यशाळेच्या समारोप सत्रात ते बोलत होते.

वंचितांच्या वेदना, संघर्ष आणि जीवनानुभव कलांच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडले जातात, तेव्हाच समाज अधिक संवेदनशील आणि समतोल बनतो, असे डॉ. शिंदे यांनी सांगितले. सिनेमा, साहित्य, नाटक आणि कविता या माध्यमांतून दुर्लक्षितांचे प्रश्न मांडले गेले, तेव्हा समाजात परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झाल्याचे त्यांनी सांगितले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेत बोलताना अभिनेते डॉ. मिलिंद शिंदे.

राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांसह आचार्य अत्रे, श्याम बेनेगल, गोविंद निहलानी, मीरा नायर, दीपा मेहता, शबाना आजमी, स्मिता पाटील, नंदिता दास, आदी कलावंतांच्या योगदानामुळे वंचितांच्या वेदनांना व्यापक वाचा फुटली. स्त्रियांना शिक्षण, मतदान, स्वातंत्र्य आणि आत्मभान मिळवून देण्यात समाजसुधारकांचे मोठे योगदान आहे. त्याचप्रमाणे सिनेमानेही वंचितांच्या जगण्याला दृष्यमान केले आणि समाजातील दडपल्या गेलेल्या आवाजांना वाचा दिली, असे डॉ. शिंदे यांनी सांगितले. संयोजन अधिविभागाचे प्रमुख डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. समन्वयक अनुप जत्राटकर यांनी आभार मानले.

विविध विषयांवर मार्गदर्शन

■ या कार्यशाळेत वंचित घटकांचे अभ्यासक अविनाश भाले (विषय- एलजीबीटीक्यूचे सिनेमातील चित्रण), अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले (वंचित घटकाचे सिनेमातील स्थान), चित्रशारदाच्या व्यवस्थापकीय संपादक अश्विनी धायगुडे-कोळेकर (सिनेमातील लिंगाधारित पूर्वग्रह), चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठाडिया (वंचितांच्या चित्रपटांचे भवितव्य आणि आव्हाने) यांनी मार्गदर्शन केले.

0 8 OCT 2026
जनप्रवास

समाजाचे सांस्कृतिक आरोग्य जपण्याची गरज : डॉ. मिलिंद शिंदे

जनप्रवास : कोल्हापूर

समाजाचे सांस्कृतिक आरोग्य जपण्यासह दुर्लक्षित आणि वंचित घटकांच्या जगण्याला मुख्य प्रवाहाशी जोडण्याची महत्त्वाची जबाबदारी कलावंताची आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध अभिनेते, कवी, लेखक डॉ. मिलिंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा बी.ए. फिल्म मेकिंग विभाग आणि अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'वंचित घटकांचे सिनेमातील स्थान' या विषयावर आयोजित दोन दिवसीय कार्यशाळेच्या समारोप सत्रात ते आज 'वंचित घटक आणि मुख्य प्रवाहातील सिनेमा' या विषयावर बोलत होते.

वंचितांच्या वेदना, संघर्ष आणि जीवनानुभव कलांच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडले जातात, तेव्हाच समाज अधिक संवेदनशील आणि समतोल बनतो, असे सांगताना डॉ. शिंदे म्हणाले, कलावंत हा केवळ मनोरंजन करणारा व्यक्ती नसून तो समाजजाणिवा जागृत करणारा, प्रबोधन करणारा आणि सांस्कृतिक आरोग्य सांभाळणारा घटक आहे. सिनेमा,



साहित्य, नाटक आणि कविता या माध्यमांतून दुर्लक्षितांचे प्रश्न मांडले गेले, तेव्हा समाजात परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झाली. डॉ. शिंदे यांनी भारतीय समाजातील वंचित घटकांच्या संघर्षाचा, विशेषतः महिलांच्या सामाजिक स्थितीचा आणि त्यांच्या आवाजाचा इतिहास उलगडून दाखवला.

पुणे येथील चित्रशारदाच्या व्यवस्थापकीय संपादक अश्विनी धायगुडे-कोळेकर यांनी 'सिनेमातील लिंगाधारित पूर्वग्रह' या विषयावर आणि चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठाडिया यांनी 'वंचितांच्या चित्रपटांचे भवितव्य आणि आव्हाने' या विषयावर मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यार्थी, चित्रपट अभ्यासक, माध्यम क्षेत्रातील व्यक्ती आणि चित्रपट रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अधिविभागाचे प्रमुख डॉ. शिवाजी जाधव यांनी संयोजन केले. समन्वयक अनुप जत्राटकर यांनी आभार मानले.

0 8 OCT 2026

तरुण भारत

वंचितांना मुख्य प्रवाहाशी जोडा

अभिनेते डॉ. शिंदे यांचे कलावंतांना आवाहन

त. भा. प्रतिनिधी,

कोल्हापूर : समाजाचे सांस्कृतिक आरोग्य जपण्यासह दुर्लक्षित व वंचित घटकांच्या जगण्याला मुख्य प्रवाहाशी जोडण्याची जबाबदारी कलावंतांची आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध अभिनेते, कवी, लेखक डॉ. मिलिंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा बी. ए. फिल्म मेकिंग विभाग आणि अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'वंचित घटकांचे सिनेमातील स्थान' या विषयावर आयोजित दोन दिवसीय कार्यशाळेच्या समारोप सत्रात ते बोलत होते. 'वंचित घटक आणि मुख्य प्रवाहातील सिनेमा' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले.



कोल्हापूर : कार्यशाळेत बोलताना अभिनेते डॉ. मिलिंद शिंदे.

डॉ. शिंदे म्हणाले, कलावंत हा केवळ मनोरंजन करणारा व्यक्ती नसून तो समाजजाणिवा जागृत व प्रबोधन करणारा घटक आहे. सिनेमा, साहित्य, नाटक आणि कविता या माध्यमांतून दुर्लक्षितांचे प्रश्न मांडले गेले, तेव्हा समाजात परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झाली.

अधिविभागाचे प्रमुख डॉ. शिवाजी जाधव यांनी संयोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 8 OCT 2026

तरुण भारत

मेघराज राजेभोसले : 'वंचित घटकांचे सिनेमातील स्थान' कार्यशाळा सुरु

सिनेमात वंचितांना स्थान आवश्यक

वंचित घटकांच्या सिनेमावर सखोल अभ्यासाची गरज असून त्यांच्याकडे दुर्लक्ष न करता चित्रपटांमध्ये योग्य स्थान दिले पाहिजे, असे मत अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजे भोसले यांनी व्यक्त केले.

| त. भा. प्रतिनिधी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बीए फिल्म मेकिंग विभाग व अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'वंचित घटकांचे सिनेमातील स्थान' या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभागात मंगळवार, ६ रोजी या कार्यशाळेला सुरूवात झाली. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते.

राजेभोसले म्हणाले, मराठी चित्रपटसृष्टीची सुरुवात कोल्हापूरस्या पुरोगामी शहरातून झाली. कोल्हापूर ही चित्रपटाची पंढरी आणि केंद्रबिंदू असलेले शहर आहे. वंचित घटकांचे सिनेमातील स्थान हा अत्यंत महत्वपूर्ण विषय असून त्याचा जाणीवपूर्वक अभ्यास होणे गरजेचे आहे.

सर्व घटकांना सिनेमात योग्य प्रतिनिधित्व मिळाले, तरच समाजाभिमुख चित्रपटांची निर्मिती होईल. विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिक ज्ञान आत्मसात करून ते स्वत:मध्ये रुजवले पाहिजे. त्याचा भविष्यात निश्चितच फायदा होईल, असेही त्यांनी स्पष्ट



कोल्हापूर : कार्यशाळेत मार्गदर्शन करताना मेघराज राजेभोसले.

केले. कोल्हापुरात अत्याधुनिक शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था सुरू करण्यासाठी आम्ही महामंडळातर्फे प्रयत्नशील आहोत. यासाठी शिवाजी विद्यापीठाने सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, समाजामध्ये सिनेमाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. दृक्-श्राव्य माध्यमाची छाप मोठी असून सिनेमा हे प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी विवेकदृष्टी ठेवून काम केले पाहिजे. मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्रीती भिसे व अभिजीत घागरे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. सायली गणेशकर हिने सूत्रसंचालन केले. साक्षी वाघमोडे यांनी आभार मानले.

यावेळी नाईट कॉलेज मराठी विभागाचे प्रमुख प्रा. अरुण शिंदे, संपादक डॉ. विजय चोरमारे, संपादक अश्विनी धायगुडे-कोळेकर, चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठडिया, डॉ. रत्नाकर पंडित, रवी सूर्यवंशी, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील, अनुप जत्राटकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 8 OCT 2026

पुढारी

वंचितांच्या सिनेमावर सखोल अभ्यास आवश्यक

मेघराज राजेभोसले यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



वंचित घटकांचे सिनेमातील स्थान हा महत्त्वपूर्ण विषय असून, त्यावर जाणीवपूर्वक आणि सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे. वंचित घटकांकडे दुर्लक्ष न करता त्यांना चित्रपटांमध्ये योग्य प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे. सर्व घटकांना सिनेमात स्थान मिळाल्यास समाजाभिमुख चित्रपटांची निर्मिती होईल, असे मत अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. फिल्म मेकिंग विभाग आणि अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या संयुक्त विद्यमाने 'वंचित घटकांचे सिनेमातील स्थान' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. मास कम्युनिकेशन विभागात सुरू झालेल्या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

राजेभोसले म्हणाले, मराठी चित्रपटसृष्टीची सुरुवात कोल्हापूरसारख्या पुरोगामी शहरातून झाली. विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिक ज्ञान आत्मसात करून ते स्वतःमध्ये रुजवावे. विद्यार्थ्यांना भविष्यात आवश्यक ती मदत करण्यासाठी महामंडळ त्यांच्या पाठीशी राहील. कोल्हापुरात अत्याधुनिक शिक्षण व प्रशिक्षण संस्था सुरू करण्यासाठी प्रयत्नशील राहू.

डॉ. शिंदे यांनी सिनेमा हे प्रभावी दृक्-श्राव्य माध्यम असल्याने विद्यार्थ्यांनी विवेकदृष्टी ठेवून समाजातील सत्य मांडावे, असे आवाहन केले.

यावेळी नाईट कॉलेज मराठी विभागाचे प्रमुख प्रा. अरुण शिंदे, अश्विनी धायगुडे-कोळेकर, चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठडिया, पत्रकारिता विभागाचे माजी प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित, चित्रपट महामंडळाचे कार्यवाह रवी सूर्यवंशी, डॉ. सुमेधा साळुंखे, अनुप जत्राटकर आदी उपस्थित होते. मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख प्रीती भिसे, अभिजित घागरे यांनी करून दिली. सायली गणेशकरने सूत्रसंचालन केले. साक्षी वाघमोडे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

08 OCT 2026
जनप्रवास

वंचितांचा सिनेमा म्हणजे केवळ दुःखाचे चित्रण नव्हे

अविनाश भाले यांचे शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

या सत्राच्या अखेरीस जागतिक सिनेमाच्या अभ्यासक डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी 'जागतिक परिदृश्यात वंचितांचा सिनेमा' या विषयावर मार्गदर्शन केले. जगभरातील विविध चित्रपटांची उदाहरणे देत त्यांनी वंश, जात-धर्म, वसाहतवाद, स्त्रीवाद, मूळनिवासी समुदाय आणि विकलांगत्व यांसारख्या विविध सामाजिक वास्तवांचे सिनेमातील चित्रण विद्यार्थ्यांसमोर उलगडले.चित्रपटातील कथानक आणि व्यक्तिरेखांच्या पलीकडे त्यामध्ये दडलेले सामाजिक संदर्भ आणि गहिरे अर्थ समजून घेण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. 'उपेक्षितांसाठीचे चित्रपट' आणि 'उपेक्षितांचे चित्रपट' यातील फरक समजून घेणे महत्त्वाचे आहे. वंचित घटकांचे प्रतिनिधित्व करताना चित्रपटकर्त्यांवर असलेली सामाजिक आणि नैतिक जबाबदारी चित्रपटाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्वीकारली पाहिजे, असे आवाहन डॉ. करेकट्टी यांनी केले.

जनप्रवास : कोल्हापूर

वंचित घटकांचा सिनेमा म्हणजे केवळ त्यांच्या दुःखाचे आणि समस्यांचे चित्रण नव्हे, तर त्यांच्या भावनिक जगाचा, अस्तित्वाचा, नातेसंबंधांचा आणि माणूस म्हणून असलेल्या संघर्षाचा संवेदनशील वेध घेणारा सिनेमा असला पाहिजे. सिनेमातील प्रतिनिधित्वाची सुरुवात लेखक आणि दिग्दर्शकाच्या सामाजिक दृष्टिकोनातून होते. त्यामुळे चित्रपटकर्त्यांनी स्वतःच्या पूर्वग्रहांकडे चिकित्सकपणे पाहणे आवश्यक आहे, असे मत वंचित घटकांचे अभ्यासक अविनाश भाले यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. फिल्म मेकिंग विभाग आणि अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'वंचित घटकांचे सिनेमातील स्थान' या विषयावर आयोजित दोन दिवसीय कार्यशाळेतील पहिल्या



दिवसाच्या सत्रात ते बोलत होते. 'एलजीबीटीक्यूचे सिनेमातील चित्रण' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले.

भाले म्हणाले, आपण ज्या जातीत, सामाजिक स्तरात किंवा वंशात जन्मतो, त्यावरून सिनेमाकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन मोठ्या प्रमाणात घडत असतो. त्यामुळे पडद्यावर कोणाचे प्रतिनिधित्व कसे केले जाते, कोणाला केंद्रस्थानी ठेवले जाते आणि कोणाला वगळले जाते, यामागे सामाजिक रचना कार्यरत असते. 'आयडेंटिटी क्रायसिस', 'मेल गेझ' आणि स्टुअर्ट हॉल यांच्या 'रेप्रेझेन्टेशन कल्चरल थिअरी'च्या माध्यमातून त्यांनी एलजीबीटीक्यू समुदायाच्या सिनेमातील चित्रणाचा वेध घेतला. सिनेमातील 'सोशल एक्स्क्लूजन'चा परिणाम केवळ पडद्यावर दिसत नाही, तर चित्रपटाच्या निर्मिती प्रक्रियेतही त्याचे प्रतिबिंब उमटते.

लेखक, दिग्दर्शक आणि इतर निर्मिती घटकांच्या सामाजिक जाणिवांमधूनच प्रतिनिधित्वाची दिशा ठरते. त्यामुळे वंचित समूहांचे चित्रण करताना त्यांच्याकडे केवळ सहानुभूतीच्या दृष्टिकोनातून पाहण्याऐवजी त्यांच्या अनुभवांना आणि माणूसपणाला केंद्रस्थानी ठेवले पाहिजे, असे भाले यांनी स्पष्ट केले

दरम्यान, या सत्राच्या सुरुवातीला ज्येष्ठ संपादक व चित्रपट अभ्यासक डॉ. विजय चोरमारे यांनी 'भारतीय चित्रपटातील वंचितांचे स्थान' या विषयावर मार्गदर्शन केले. चित्रपटकर्त्यांनी चिकित्सक असायला हवे. केवळ चित्रपट बनविण्याचे तंत्र आत्मसात करण्याबरोबरच चित्रपट समजून घेण्याची दृष्टी विकसित करणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

बाबूराव पेंटर यांच्या १९२५ सालच्या 'सावकारी पाश'पासून भारतीय चित्रपटातील सामाजिक आशयाच्या प्रवासाचा मागोवा घेत डॉ. चोरमारे यांनी १९६०च्या दशकातील समांतर चित्रपट चळवळीपर्यंत झालेला विकास स्पष्ट केला. जागतिकीकरणाच्या प्रभावानंतर समांतर सिनेमा आणि सामाजिक प्रश्नांवर आधारित चित्रपट मागे पडल्याचे त्यांनी नमूद केले. मात्र, मराठी, तामिळ आणि मल्याळम चित्रपटांनी सामाजिक आशयाची ही परंपरा टिकवून ठेवली. त्यामुळे वंचितांचे प्रश्न मांडणाऱ्या अनेक चित्रपटांना आज मुख्य प्रवाहातील सिनेमात स्थान मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

08 OCT 2026
सकाळ

महिलांमधील कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण आवश्यक : डॉ. जत्राटकर

कोल्हापूर, ता. ७ : 'महिलांमध्ये उपजतच असणारे सामाजिक, आर्थिक व्यवस्थापन कौशल्य विकसित होण्यासाठी योग्य प्रशिक्षणाची गरज आहे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी केले.

विद्यापीठाच्या कौशल्य आणि उद्योजकता विकास केंद्र व इंडोकाऊंट फाउंडेशनअंतर्गत महालक्ष्मी कौशल्य विकास केंद्र गोकुळ शिरगाव यांच्यातर्फे 'महिलांसाठी मार्केटिंग आणि विक्री कौशल्य' या विषयावर कार्यशाळा झाली. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, तर इंडोकाऊंटचे सल्लागार प्रफुल्ल रंगारी प्रमुख उपस्थित होते.

महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होण्याच्या दृष्टीने इंडोकाऊंट समूह सातत्याने प्रयत्नशील असल्याचे रंगारी यांनी सांगितले. महिलांनी बचत गटांच्या माध्यमातून प्रभावी ब्रँडिंग, मार्केटिंग आणि विक्री व्यवस्थापन कौशल्य आत्मसात करणे आवश्यक असल्याचे पवार यांनी सांगितले.

कार्यक्रमास ग्रामोद्योग अधिकारी संदीप माने, व्यवसाय मार्गदर्शक रवींद्र खैरे, स्मिता जाधव, दिशा अग्रवाल उपस्थित होते. कार्यशाळेत खैरे यांनी मार्केटिंग, विक्री कौशल्य, ग्राहकांशी संवाद, उत्पादनाचे सादरीकरण आणि व्यवसायवृद्धीसाठी आवश्यक विविध बाबींवर मार्गदर्शन केले. प्रमोद कांबळे यांनी स्वागत केले. ईश्वर पुजारी यांनी आभार मानले.

0 8 OCT 2026

सकाळ

गोविंदराव टेंबे स्मृतिदिनानिमित्त उद्या व्याख्यान

कोल्हापूर : ज्येष्ठ संगीतकार, रंगकर्मी गोविंदराव टेंबे यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी (ता. ९) सकाळी साडेअकरा वाजता 'गोविंदराव टेंबे : जीवन आणि चरित्र' यावर हार्मोनियम वादक केशवचैतन्य कुंटे आणि शास्त्रीय गायक सुधीर पोटे यांचे व्याख्यान होणार आहे. विद्यापीठातील कल्चरल क्लबअंतर्गत संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग आणि मराठी अधिविभाग यांच्यातर्फे होणाऱ्या व्याख्यानासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग प्रभारी प्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी केले.

0 8 OCT 2026
तरुण भारत

गोविंदराव टेंबे स्मृतिदिनी विद्यापीठात उद्या व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील कल्चरल क्लब अंतर्गत संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग आणि मराठी अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ संगीतकार व रंगकर्मी गोविंदराव टेंबे यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'गोविंदराव टेंबे : जीवन आणि चरित्र' या विषयावर शुक्रवार दि. ९ रोजी व्याख्यानाचे आयोजन केले आहे. पुणे येथील प्रसिद्ध हार्मोनियम वादक आणि संगीतशास्त्राचे अभ्यासक प्रा. केशवचैतन्य कुंटे यांचे, तसेच शास्त्रीय गायक व अभ्यासक संगीताचार्य पं. सुधीर पोटे (कोल्हापूर) हे मार्गदर्शन करणार आहेत. सकाळी ११.३० वाजता व्याख्यानाला सुरूवात होणार आहे. यावेळी उपस्थित रहावे, असे आवाहन संगीत व नाट्यशास्त्र प्र–अधिविभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई व प्रा. (डॉ.) रणधीर शिंदे यांनी केले आहे.

08 OCT 2026

तरुण भारत

कडेगावला २८ रोजी जागतिक अभिजात मराठी भाषा परिषद

त. भा. प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठ व भारती विद्यापीठाचे आयोजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ व भारती विद्यापीठाचे मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महाविद्यालय, कडेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक अभिजात मराठी भाषा आणि साहित्यातील संशोधन: महाकाव्य, काव्य आणि भारतीय ज्ञान परंपरा या विषयावर दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती परिषदेचे प्राचार्य डॉ. विवेकानंद रणखांबे यांनी दिली.

सदरची परिषद कडेगाव येथे बुधवार दि. २८ व २९ रोजी होणार आहे. या परिषदेत भारतासह परदेशातील भाषा, साहित्य, अभिजात परंपरा, भारतीय ज्ञानपरंपरा, भाषाविज्ञान आणि संस्कृती या क्षेत्रांतील तज्ज्ञ, संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थी सहभागी होणार आहेत. मराठी भाषा, तिची अभिजात परंपरा, भारतीय ज्ञानपरंपरा आणि विविध संस्कृतींमधील भाषिक–साहित्यिक अनुबंध यांचा बहुविषयक दृष्टिकोनातून अभ्यास करण्यासाठी या परिषदेचे आयोजन करण्यात आल्याचे डॉ. रणखांबे यांनी सांगितले.

दि. २८ रोजी सकाळी ९.३० वाजता ९२व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या माजी अध्यक्षा, ज्येष्ठ साहित्यिक, कवयित्री व संशोधक डॉ. अरुणा ढेरे यांच्या प्रमुख उपस्थितीत परिषदेचे उद्घाटन होणार आहे.

शोधनिबंधांचे होणार सादरीकरण

या परिषदेत संशोधकांकडून शोधनिबंधांचे सादरीकरण होईल. २९ ऑक्टोबर रोजी जागतिक ख्यातीच्या औंध वस्तुसंग्रहालयाला वारसा भेटीचेही आयोजन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी समन्वयक डॉ. मच्छिंद्र कुंभार, डॉ. सविता माळी व डॉ. महेश माळी यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

0 8 OCT 2026

सकाळ

कडेगावला होणार जागतिक अभिजात भाषा परिषद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि भारती विद्यापीठाचे मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महाविद्यालय यांच्यातर्फे 'जागतिक अभिजात भाषा आणि साहित्यातील संशोधन' या विषयावर २८ आणि २९ ऑक्टोबरला आंतरराष्ट्रीय परिषद कडेगाव (जि. सांगली) येथे होणार आहे. या परिषदेत भारतासह परदेशातील भाषा, साहित्य, अभिजात परंपरा, भारतीय ज्ञानपरंपरा, भाषाविज्ञान आणि संस्कृती या क्षेत्रांतील तज्ज्ञ, संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी सहभागी होणार आहेत. परिषदेचे उद्घाटन २८ ऑक्टोबरला सकाळी साडेनऊ वाजता ९२ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या माजी अध्यक्षा डॉ. अरुणा ढेरे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. यावेळी कुलगुरू डॉ. आर. के. कामत, आमदार विश्वजित कदम, विजयमाला कदम, डॉ. के. डी. जाधव, एम. एस. सगरे प्रमुख उपस्थित असतील, अशी माहिती परिषदेचे प्राचार्य डॉ. विवेकानंद रणखांबे यांनी दिली.